**शिक्षण संचालनालय**
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
महाराष्ट्र राज्य
**मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१**

सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**

Government of Maharashtra
**DIRECTORATE OF EDUCATION**
(Secondary & Higher Secondary)
**Maharashtra State**
Central Building, Dr.Annie Besant Road, Pune-१

w'site : education.maharashtra.gov.in Phone : (०२०) २६१२ ०३६१ e-mail : doehighersec@gmail.com

**परिपत्रक**

**क्र.विद्या-ए-१/११.प्रवेश/२०२१/२६४५**
**दिनांक-२६/०८/२०२१**

**प्रति,**
**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
**मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर**

**संदर्भ:- इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२१-२२**
आवश्यक कागदपत्रे सादर करणे व इतर प्रवेशाचे कार्यवाहीबाबत.

राज्यातील मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका या पाच महानगर क्षेत्रांत राबविण्यात येत असलेल्या इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**१. इ.११वी प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे अपलोड / सादर करणे-**

विद्यार्थ्यांना अलॉटमेंट नंतर प्रवेशावेळी उर्वरित कागदपत्रे अपलोड करण्याची संधी उपलब्ध असेल. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (NCL) प्रमाणपत्र मिळविण्यासाठी साधारणपणे २१ दिवसांचा कालावधी लागत आहे, तसेच कोविड-१९ आजाराचे सावट या बाबी विचारात घेता (NCL) प्रमाणपत्र सादर करण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात येत आहे.

विद्यारर्थ्यांनी उपलब्ध असलेली सर्व प्रमाणपत्रे अलॉटमेंट वेळी अपलोड करावीत आणि (NCL) प्रमाणपत्र नसल्यास ते मिळविण्यासाठी केलेल्या अर्जाची पोच/Receipt अपलोड करावी. त्या आधारे विद्यालयांना प्रवेश देता येतील. त्यानंतर सदर विद्यार्थ्यांनी ३० दिवसांत (NCL) प्रमाणपत्र अपलोड/सादर करणे आवश्यक राहील अन्यथा अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द होतील.

**टीप- खुल्या प्रवर्गातून प्रवेश मिळाला असल्यास अशा विद्यार्थ्यांना प्रवर्गाचे अनुषंगाने प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक नाही.**

**२. विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज वेळेत व अचूक प्रमाणित करणे.**

विद्यार्थ्यांने भरलेल्या प्रवेश अर्जातील माहितीची पडताळणी, अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या आधारे केली जाते. तथापि अर्जाची पडताळणी होण्यासाठी विलंब होणे तसेच Verification अचूक न होणे या बाबी निदर्शनास आलेल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यास अर्जाचा भाग-२ वेळेत भरता येत नाही अथवा त्यास प्रवेश नाकारला जाऊ शकतो. सदर बाबी टाळणे आवश्यक आहे. या बाबत संबंधितांना सविस्तर सूचना देण्यात याव्यात व अर्ज Verification ची कार्यवाही अचूक व वेळेत पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

**३. शासनाने मंजूर केलेल्या जादा तुकड्या/ वर्ग प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट करुन घेणे.**

शासन स्तरावरुन उच्च माध्यमिक विद्यालयांना वेळोवेळी अतिरिक्त शाखा, जादा तुकड्या मंजूर केल्या जातात. सदर शाखा/ तुकड्या प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर तात्काळ समाविष्ट करुन घ्याव्यात. सन.२०२१-२२ मध्ये इ.१०वी उत्तीर्ण विद्यार्थी संख्येमध्ये वाढ झालेली असलेमुळे त्या प्रमाणात प्रवेश क्षमता उपलबध होणे गरजेचे आहे. तरी याबाबत आवश्यक कार्यवाही तुकडी मंजुरीचा शासन निर्णय तपासून तात्काळ करावी.

**४. प्रशिक्षण व उद्बोधन-**

प्रवेश प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर करावयाची कार्यवाही याबाबत सर्व संबंधित यांना सविस्तर सूचना व मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. यामुळे येणाऱ्या शंका व संभ्रम दूर होईल. यासाठी मार्गदर्शन केंद्र, कनिष्ठ महाविद्यालये, पालक यांचे पुरेसे उद्बोधन करावे. प्रवेश देतांना उच्च माध्यमिक विद्यालयांनी विद्यार्थ्यांने दिलेल्या माहितीची पुनश्च काळजीपूर्वक तपासणी करुन सुलभ रितीने विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करावेत.

26.08.21

**(द. गो. जगताप)**
**शिक्षण संचालक**
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

**प्रत, माहितीस्तव.**
**विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद, लातूर व कोल्हापूर.**